Exh.32/D

रे क नं. ५८/२०२६

**मे दिवाणी न्यायाधिशसो कनिष्ठ स्तर, गारगोटी,**

**यांचे कोर्टात...**

**१) श्री. महिपती रामचंद्र पाटील,** **वादी**

विरुध्द

**१) श्री. आदिनाथ महादेव पाटील,** **प्रतिवादी**

वगैरे २

Order

Seen. Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2026.07.01 16:42:45 +0530

NISHANT DIPAK RUDRABHATE

**यातील प्रतिवादी ३ तर्फे वादीने दाखल दाव्यातील तुर्तातुर्त मनाई अर्जास प्रतिवादी ३ तर्फे म्हणणे खालीलप्रमाणे**

१) सदरचा वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज पुर्णपणे खोटो, लबाडीचा, रचनात्मक साधनी व आपमतलबीपणाची आहे. त्यातील संपुर्ण मजुकर व कथने पूर्णतः खोटी, चुकीची, लबाडीची, रचनात्मक व आपमतलबीपणाची आहेत. सबब ती सदर प्रतिवादी ३ कादापिही मान्य व कबुल नाहीत. सबब सदरचा वादीच्या दाव्यास व तुर्तातुर्त मनाई अर्जास कोणतेही कारण घडले नसतांना दाखल केला असल्याने तो आहे त्या परिस्थितीत फेटाळणेस पात्र आहे.

२) सदर वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम १ मधील दावा मिळकतींचे वर्णन हे पुर्णतः खोर्ट, चुकीचे, लबाडीचे, रचनात्मक व आपमतलबीपणाचे आहे. सदर वादींनी दावा मिळकताचे कायद्यातील तरतुदीप्रमाणे संपुर्ण वर्णन दिलेले नाही. तसेच

Assistant Superintendent
Gargoti

मोघमपणे वर्णन नमुद करून त्या आधारे सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल केला आहे. सदर वादी यांनी नमुद केलेप्रमाणे मिळकत कोणत्याहीरितीने आस्तित्वात नाही त्यामुळे मिळकतीचे वर्णन संपुर्णतः खोटे व लबाडीचे केलेले आहे. सबब सदर दावा मिळकतीचे वर्णन हे चुकीचे असलेने वादीचे दावेस व तुर्तातुर्त मनाई अर्जास कायदयातील तरतुदींची बाधा असून सदर दावेस सी.पी.सी. १९०८ चे ऑ ७ रू ३ प्रमाणे बाधा येत असून सदरचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज याही कारणास्तव आहे त्या परिस्थितीत फेटाळणेस पात्र आहे. प्रस्तुत वादीने दावा व मनाई अर्जातील दर्शविलेला चुर्तसिमा या स्वताःच्या फायदयासाठी दर्शविलेला असल्याने त्यास वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा. मे. कोर्टात आणलेला नाही. त्यामुळे सदरचा मनाई अर्ज आहे त्या परिस्थितीत फेटाळण्यास पात्र आहे.

३) सदरच्या वादीच्या तुर्तातुर्त मनाई अर्जातील कलम २ मधील मजकूर "सदर मिळकत ही यापुर्वी वादी यांचे वडील रामचंद्र बाबाजी पाटील यांनी दिनांक १५/०२/१९८८ रोजी ------------------------------------------------------------------------------------------ --------------------------रोजी वादी यांच्या आई सौ. सरस्वती रामचंद्र पाटील यांच्या नावे खरेदी केलेली होती व आहे." सदरचा संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कादापिही मान्य व कबुल नाही. सदर मजकूरात वादी यांनी ४०X१०० फूट इतक्या क्षेत्रामध्ये कब्जे वाहीवाट असे म्हटले आहे सदरचा मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक असलेने तो यातील प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही.

Assistant Superintendent
Gargoti

४) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ३ मधील मजकूर "यातील वादी यांचे पुर्व हक्कदार यांनी सदर दावा मिळकत ही खरेदी घेतली नंतर सदर खरेदीपत्राचे फेरफारस प्रस्तुत------------------------------------------------------------ ------------------------------------------------------ यामुळे यातील सर्व सह हिस्सेदार यांनी वादी याना सुरूवातीपासुनच व जाणीवपुर्वक त्रास देण्याचे काम केलेले आहे हे स्पष्ट होते." सदरचा संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, रचनात्मक व आपमतलबीपणाचा आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कदापिही मान्य व कबुल नाही. सदर प्यारामध्ये वर्णन केलेल्या मजकूर हा यांतील प्र.वादी यांचे सहहिस्सेदारा बाबत असलेने तो प्र.वादी यांनी लागु होत नाही.

५) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ४ मधील मजकूर "त्यानंतर वादी यांनी सदर मिळकत ही त्यांची आईच्याकडून रजिस्टर दस्त क्र. ६०/२०२० चे नोंदणीकृत बक्षीस ---------------------------------------------------- ------------------------ प्रतिवादी हे वादी यांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करून घ बांधत असल्याले स्पष्ट होत आहे." सदर प्यारामधील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य नाही सदर प्यारामध्ये नमुद केलेला दाव्यातील नं. ५१/२०२० या प्र.वादी नं. १ यांचे चुलते व प्र.वादी २ यांचा चुलत भाऊ यांनी दाखल केले आहे सदर दावा हा मोहन ईश्वरा पाटील यांनी स्पेसिफिक रिलीफ ॲक्टचे कलम ५, ३४ व ३८ प्रमाणे हक्कज्ञापन व मनाई करता दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मोहन ईश्वरा पाटील वादी यांनी आप्पासो ईश्वरा पाटील यांनी दि.०५/१०/२००१ रोजी तथाकथित रजिस्टर दस्त क्र. २२७७ हा करून दिलेल्या दस्त हा मुलतः पोकळ व बेकादेशीर असलेने तो मोहन ईश्वरा पाटील यांचेवर बंधनकारक नाही तो रद्दबादल होऊन मिळावा याकरिता मे. कोर्टामध्ये दावा दाखल केलेला आहे

Assistant Superintendent
Gargoti

तो सध्या प्रलंबित आहे. असे असताना यातील वादी हे प्र.वादी १ व २ यांना नाहक त्रास देण्याकरिता खोटया चुर्तसिमा नमुद करून प्र.वादी यांनी वादीच्या तथाकथीत मिळकतीमध्ये कोणत्याही अतिक्रमण केले नसतांना आपमतलबीपणाचा दावा दाखल केला आहे. सदरचे सरस्वती यांच्या कडून वादी यांनी घेतलेले बक्षीसपत्र हे आई व मुलगा या नात्याने केले असल्याने त्यातील मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाहीत. तथकथीत आप्पासो ईश्वरा पाटील यांचे घेतलेले खरेदीपत्र हे विना चर्तसिमेचे असल्यामुळे सदर वादी यांनी दाव्यामध्ये नमुद केलेले चर्तसिमा पोळकस्थळ आहे त्या कदापिही प्रतिवादी यांना मान्य व नाही प्रवादी १ व २ यांची सदरची जागा वडीलोपार्जित असलेने यातील वादी यांनी करवुन घेतलेल्या मोहन ईश्वरा पाटील व त्यांचे इतर भाऊ यांनी प्र.वादी बांधत असलेले मिळकतीच्या हद्दीबाबत कधीही प्रश्न उपस्थितीत किंवा तक्रार उपस्थितीत केलेली नव्हती व नाही. तसेच सदर मिळकत वादीची तथाकथीत मिळकतीस प्र.वादी यांची मिळकत असताना प्र.वादी यांनी वादी हे बांधत असलेल्या मिळकतीस खिडक्या ठेवल्या त्यावेळी प्र.वादी यांनी वादी यांना उत्तरेकडील साईटला कोणतेही जागा नाही असे असताना तुम्ही त्यामध्ये खिडक्या ठेऊ नका अशी तक्रार उपस्थित केली होती. त्यावेळी वादी यांनी सदरचा खिडक्या या बांधकाम करून मुजवुन घेतल्या होत्या. असे असताना सध्या निव्वळ वादी यांची कोणतेही जागा उत्तरेकडील प्र.वादी यांच्या साईटला जागा नसताना निव्वळ मोघमध्ये दाव्यामध्ये ६X८५ फूट अशी जागा नमूद केली ती पुर्णपणे चुकीची व प्र. वादी यांना त्रास देण्याच्या हेतुने केली असलेने प्रस्तुतचा दावा आहे त्या परिस्थीत फेटाळणेस पात्र आहे. त्यामुळे प्रस्तुत प्यारामध्ये वर्णन केलेला मजकूर खोटा व चुकीचा आहे. त्यामुळे वादी हे कोणतेही चुर्तसिमा शाबित करू शकत नाहीत त्यामुळे वादीचा दावा असे त्या परिस्थिती फेटाळण्यास पात्र आहे.

Assistant Superintendent
Gargoti

६) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ५ मधील मजकूर "प्रस्तुत प्रतिवादी यांचे नावे केवळ सातबारा पत्रकी ० हेक्टर १० आर ४० पॉ. ----- ---------------------------------------- त्यांचे नावावर करून दिलेले नाहीत यावरुन प्रतिवादी हे खेकटेकोर असल्याचे व त्रास देणारे असल्याचे स्पष्ट होते." सदरचा संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कादापिही मान्य व कबुल नाही. सदर मजकूरासी प्र.वादी यांचा कोणताही संबंध नाही.

७) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ६ मधील मजकूर " सदर घराचे बांधकाम करत असताना वादी यांनी त्यांचे घराचे -------------------- ------------------------------------- यांची पुर्णपणे माहिती यातील प्रतिवादी यांना होती व आहे." सदरचा संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कादापिही मान्य व कबुल नाही. सदर मजकूर नमुद केलेल्या खिडक्याबाबत यापुर्वी यातील प्र.वादी यांनी वादी यांच्याकडे तक्रार उपस्थित केली आहेता. वादी यांनी त्या बांधकाम करून मुजवुन घेतल्या होत्या. परंतु सध्या प्र.वादी यांना निव्वळ त्रास देण्याच्या हेतुने सदरचा खिडक्या ओपन केल्या आहे. वादी यांनी प्र.वादी कडील उत्तरेकडील साईटला कधीही जागा सोडलेली नव्हती व नाही त्यामुळे प्रस्तुतचा दावा आहे त्या परिस्थितीत फेटाळण्यास पात्र आहे.

८) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ७ मधील मजकूर " प्रस्तुत प्रतिवादी हे वादी यांचे घराचे उत्तरेकडील बाजुस वादी यांचे---------------- --------------------- त्यावर संबंधितांनी कोणतीही कारवाई केलेली नाही." सदरचा

Assistant Superintendent
Gargoti

संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कादापिही मान्य व कबुल नाही. सदर मजकूरामध्ये नमुद केलेला मजकूर पुर्णपणे खोटे व चुकीचे आहे प्र.वादी यांनी कधीही वादी यांच्या जागेमध्ये अतिक्रमण केलेले नाही. प्र.वादी हे स्वता:च्या जागेमध्ये बांधकामत करत आहेत. प्र.वादी यांची वडीलोपार्जित मिळकत आहे त्यामुळे सदर वादी यांनी सदर जागेबाबत मोजणी अथवा रितसर खरेदीपत्राप्रमाणे मे. न्यायालयाकडून वाटप करून घेतलेले नव्हते व नाही. वादी हे मागत असलेली दाद कायदयांनी मागता येणार नाही अथवा त्या संबंधी केलेल्या तक्रारी या पोकळास्त आहेत. त्यामुळे वादीचा दावा आहे त्या परिस्थीत फेटाळण्यास पात्र आहे.

९) सदरच्या वादीच्या दाव्यातील व तुर्तातुर्त मानई अर्जातील कलम ८ मधील मजकूर "परंतु प्रतिवादी यांना वादी यांची मिळकत हडप करण्याची असल्याने प्रतिवादी ---- --------------------------------------सदरचे पत्र ग्रामपंचायत मुदाळ यांना मिळालेले आहे." सदरचा संपुर्ण मजकूर खोटा, चुकीचा, लबाडीचा, साधनी, आपमतलबीपणाचा व रचनात्मक आहे. सबब, तो सदर प्रतिवादींना कादापिही मान्य व कबुल नाही. व त्याखालोखालील सब प्यारा १ मधील सब प्यारा १ ते ५ यामधील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे. सदर प्यारामध्ये नमुद केलेल्या वादी यांना सकृतदर्शनी केस केव्हाही नव्हती व नाही. त्यामुळे वादी यांना यशाची खात्री नव्हती व नाही. याउलट प्र.वादी यांना सकृतदर्शनी केस आहे. न्यायाच्या समतोलत्वाचा तराजु हा प्र.वादी यांच्या बाजुने आहे. वादीचा अर्ज मंजुर केलेस प्र.वादी यांचा कधीही न भरून येणारा नुकसान होणार आहे. व प्र.वादी यांचे अपरीमीत असे, आर्थिक, प्रापंचिक नुकसान होणार आहे प्र.वादी यांना न्यास हक्काचे नुकसान होणार आहे.

Assistant Superintendent
Gargoti

वादी हे स्वच्छ हाताने मे. कोर्टात आले नसलेमुळे वादी हे मागत असलेली दाद कायदयाने देता येणार नाही.

१०) सदर वादीचे दावेतील कलम ९ मध्ये नमुद केलेले दावेचे कारणातील मजकूर संपुर्णपणे खोटा, चुकीचा, साधनी व रचनात्मक आहे. वादीचे दावेस व मनाई अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही, जे घडले असे नमुद केले आहे ते पुर्णतः खोटे, चुकीचे, लबाडीचे व खेडसाळपणाचे आहे. प्र.वादी यांनी केव्हाही वादी यांच्या क्षेत्रामध्ये बांधकाम केलेले नाही प्र.वादी यांचे सदरचे क्षेत्र हे वडिलोपार्जित आहे. त्यामुळे कारणातील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. सबब ते प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. सदर दावेस कोणतेही कारण घडलेले नाही. निव्वळ प्रस्तुत प्रतिवादींना त्रास व जाच देणेच्या हेतुने कारण घडलेचे नमुद करून खोटा व चुकीचा दावा व मनाई अर्ज मे. कोर्टात वादी यांनी दाखल केला आहे. तो आहे त्या परिस्थितीत फेटाळण्यास पात्र आहे.

११) सदरचे वादीचे दावेतील कलम १० व ११ मधील मजकूर पुर्णपणे खोटा व चुकीचा आहे तो प्र.वादी यांनी मान्य व कबुल नाही. तुर्तातुर्त मनाई अर्ज १२ मधील विनंती सदरातील मजकुर पुर्णपणे खोटा, चुकीचा, लबाडीचा, रचनात्मक असुन वादीची मागणी कदापिही मान्य होणारी नाही वादीनी सदर दावेमध्ये व मनाई अर्जात सदर प्रमाणे मालकी व वहिवाटीबाबत कोणतीही कागदपत्रे हजर न करता मोघमपणे सदरच्या दादी मागणी केल्या आहेत तसेच सदर दावा मिळकतीचे अनुषंगाने वादीस कोणतीही केस नाही सबब, सदरचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज आहे त्या परिस्थितीत फेटाळणेस पात्र आहे.

Assistant Superintendent
Gargoti

१२) प्रस्तुत प्रतिवादींचे वरील कथनास कोणतीही बाधा न येता सदर प्रतिवादीचे वादीचे दावा व मनाई अर्जाबाबत वस्तुस्थिती अशी की, सदरचा दावा वादींनी प्रतिवादीने विरुध्द खोटा, चुकीचा, रचनात्मक व आपमतलबीपणाचे कथनाआधारे केला असून सदर वादींनी दावेमध्ये नमुद केलेप्रमाणे कोणतीही वस्तुस्थिती घटलेली नाही अगर त्याप्रमाणे वादीने नमुद केलेल्या चुर्तसिमेप्रमाणे प्र.वादी यांनी वादीच्या जागेमध्ये अतिक्रमण केले नव्हते व नाही. सदर वादी यांनी रचनात्मक चर्तुसिमा नमुद करून मे. कोर्टातमध्ये दावा दाखल केलेला आहे. सदर मिळकत नमुद केली आहे. वादीचे मिळकती संदर्भात अवलोकन होत नाही. (Identity of suit property) त्यामुळे वादीच्या निशान ५ चा अर्ज खर्चासह ना मंजुर करण्यात यावा. वादी यांनी सदर प्र.वादी यांच्या अन्य सातबारा पत्रकी असणाऱ्या अन्य पक्षकारांना पक्षकर (Necessary Party) केले नसलेमुळे सदर दावेस (Non Joinder of Necessary Parties) या तत्वाची बाधा असलेमुळे त्यामुळे प्रस्तुत दावा व मनाई अर्ज खर्चासहीत ना मंजुर करण्यात यावा. प्रस्तुत वादी हे दाव्यामध्ये नमुद केलेली मिळकत ही विकत घेतली असलेने त्याअनुषंगाने सदर मिळकतीबाबत वादी यांनी कधीही मे. कोर्टामध्ये वाटप मागितले नव्हते व नाही. त्यामुळे सदर मिळकत ही वादी यांना कोणत्या कायदेशीर बाबी पुर्ण करून मिळकतीचा कब्जा ताब्यात घेतलेला आहे त्याबाबत मे. कोर्टामध्ये कायदेशीर पुरावा हजर केलेल्या नसल्यामुळे वादीचा दावा व मनाई अर्ज आहे त्या परिस्थितीत फेटाळण्यास पात्र आहे. सदर वादी हे तथाकथीत खरेदी रजिस्टर दस्त नं. २२७७/२००१ च्या आधारे हक्क सांगत आहेत. त्यामध्ये खरेदीपत्रामध्ये मोघम चर्तुसिमे असलेमुळे वादी यांना नमुद दावा मिळकतीतील चतुसिमेतील कधी प्राप्त झालेले नव्हते व नाही असे असताना सदर वादी हे प्र.वादी यांच्या हद्दीबाबतचा वाद उपस्थित करता येणार नाही त्यास कोणत्याही कागदोपत्री पुरावा उपस्थित करता येणार नाही व सदर दाव्यातील नमुद केलेल्या अतिक्रमणाचा

Assistant Superintendent
Gargoti

मजकूर व त्याबाबत मागत असलेल्या मनाई ही पोकळस्त असलेने अशी मनाई ही कायदयानी कधीही देता येणार नाही सदर अतिक्रमण प्र.वादीने वादीच्या जागेत केव्हाही केलेले नाही प्र.वादीचा सदरची जागा वडीलोपार्जित कब्जे वहिवाटीने आलेली मिळकत आहे. यातील प्र.वादी यांचे भाऊ मोहन ईश्वरा पाटील व आप्पासो ईश्वरा पाटील यांनी प्र.वादी यांच्या मिळकतीबाबत केव्हाही वाद उत्पन्न केलेला नव्हता व नाही प्र.वादी हे सन १९८९ पुर्वीपासुन सर्व्हे नं. ५८ मध्ये त्यानंतर त्याचा गट नं. १३४ स्वतंत्रपणे कब्जे वाहीवाटीत आहेत. सदर प्र.वादी हे याच कब्जेवहिवाटीस सध्या घर बांधकाम करत आहेत. परंतु आतील वादी हे तथाकथीत खरेदीपत्राच्या आधारे Co- Owner आहेत. त्यामुळे सदर वादी यांनी तथाकथीत खरेदीपत्राचे आधारे केव्हाही चर्तसिमा फिक्स केलेल्या नाही त्यामुळे वादी यांना मागत असलेली दाद केव्हाही कायदयाने मागता येणारे नाही. प्र.वादी हे वडीलोपार्जित मिळकतीमध्ये वाटपा व कब्जे वहिवाटीने मालक असलेने त्याच मिकळतीमध्ये प्र.वादी यांच्या तथाकथीत मिळकतीमध्ये केव्हाही अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. निव्वळ मोघम मध्ये ६X८५ फूटाचे अतिक्रमण झाले आहे असे खोटे नमुद केले आहे त्यास कागदोपत्री पुरावा नाही. वादी यानी तथाकथीत खरेदीपत्र हे समाईक कब्जे वहिवाटीचे क्षेत्र खरेदी केले असल्यामुळे त्याबाबत वाटपाचा दावा आज तागायत मे. कोर्टात दाखल नाही. याही कारणास्तव सदरचा दावा आहे त्या परिस्थितीत फेटाळण्यास पात्र आहे.

प्रस्तुत वादी यांनी मे. कोर्टामध्ये रजिस्टर दस्त नं. २२७७/२००१ चे रजिस्टर खरेदीपत्र हजर केले आहे त्यामध्ये कोणत्याही चतु:र्सिमा नमुद नाहीत. तसेच प्रस्तुत वादी यांना रजिस्टर दस्त नं. २२७७/२००१ इ.रोजीचे खरेदीपत्रात नमुद केलेली मिळकत गट नंबर १३४ मधील आप्पासो ईश्वरा पाटील यांच्या हिश्श्याची विक्री केली होती. प्रस्तुत आप्पासो ईश्वरा पाटील यांना १ आणा १ पैसे इतकीच मिळकत ७/१२

Assistant Superintendent
Gargoti

पत्रकी मालकी हक्काला होती. सदरची मिळकत ही प्रस्तुत रजिस्टर दस्त नं. २२७७/२००१ इ.रोजीचा दस्तामध्ये सरस्वती रामचंद्र पाटील यांना विना चतु:र्सिमा सामाईक जमिनीचे खरेदीपत्र करुन दिले. तत्पुर्वी सदर जमीन ही आप्पासो ईश्वरा पाटील यांनी रजिस्टर दस्त नं. १४८७/१९९८, दि. २७/०८/१९९८ इ.रोजी प्रतिवादी यांच्या कब्जात असणाऱ्या क्षेत्राच्या पाठीमागील बाजुची म्हणजे जवळपास ५० मीटर अंतरावरील मिळकत ही यातील आप्पासो ईश्वरा पाटील यांनी पुर्वेस अंतु गणु पाटील, पश्चिमेस विलास आप्पासो गोडसे, दक्षिणेस पाणंद रस्ता व उत्तरेस मराठी शाळा अशा चतु:र्सिमेतील आप्पासो ईश्वरा पाटील यांची संपुर्ण मिळकत १ आणा १ पै. इतकी मिळकत ही रजिस्टर दस्त नं. १४८७/१९९८ ने दि. २७/०८/१९९८ इ.रोजी शिवाजी महिपती पाटील यांना विक्री केली होती व आहे. त्याप्रमाणे शिवाजी महिपती पाटील हे सध्या रहाते घर बांधुन कब्जे वहिवाटीत आहेत. सदर कब्जे वहिवाटीत असलेबाबतचा हातनकाशा यातील वादी यांनी जोडला आहे. यावरुनही शिवाजी महिपती पाटील हे सदर आणेवारीप्रमाणे कब्जे वहिवाटीस असलेबाबतचा सबळ पुरावा मे. कोर्टात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत वादी हे रजिस्टर दस्त नं. २२७७/२००१ ने सांगत असलेला हक्क कोणत्याही मे. कोर्टात शाबित झालेला नाही. त्यामुळे वादी यांची दावा मिळकत संदर्भात अवलोकन होत नाही (Identity of suit property) त्यामुळे वादीच्या निशान ५ चा अर्ज खर्चासह ना मंजुर करण्यात यावा.

सदर रजिस्टद दस्त नं. २२७७/२००१ बाबत आप्पासो ईश्वरा पाटील यांचे भाऊ यांनी रे.क.नं. ५१/२०२० चा दावा दाखल केला असलेने सदर खरेदीपत्राच्या आधारे वादी करुन घेतलेले बक्षिसपत्र हे देखील मुलत: बेकायदेशीर असे असलेने त्यातील नमुद चतु:र्सिमेच्या आधारे वादी हे मागत असलेली दाद कायद्याने केव्हाही देता येणार नाही. मुलत: वादी हे सध्या ७/१२ पत्रकी नमुद असणाऱ्या क्षेत्रामध्ये जादा

Assistant Superintendent
Gargoti

क्षेत्रामध्ये वहिवाट करत असलेने प्रतिवादी विरुध्द खोट्या आशयाचा मजकुर नमुद करुन निव्वळ प्रतिवादींना त्रास देणेच्या उद्देशाने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये नमुद केलेले ६x८५ फुट वादीच्या जागेत अतिक्रमण करत असलेबाबतचा कोणताही पुरावा मे. कोर्टांत हजर केलेला नसलेने सदर मोघम मोजमापाच्या आधारे वादींना केव्हाही प्रतिवादीविरुध्द कायद्याने दाद मागता येणार नाही. सदर कारणांचा विचार करुन सदरचा दावा आहे त्या परिस्थितीत फेटाळणेस पात्र आहे.

१३) सदर वादीचे मनाई अर्जातील दाद नामंजुर झालेस त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. मात्र, सदर वादींस कोणतीही दाद मंजुर झालेस सदर प्रतिवादींचे मालकी हक्कांस कब्जे वहिवाटीस सदर वादी दांडगावा करून प्रतिवादीचे कब्जे वहिवाटीस बाधा निर्माण करणार आहेत त्यामुळे सदर प्रतिवादींचे कधीही कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब सदरचा दावा व मनाई अर्ज याही कारणास्तव आहे त्या परिस्थितीत फेटाळणेस पात्र आहे.

१४)सदर वादी हे प्रतिवादी यांना मुद्दाम व हेतुपुरस्परपणे सदरप्रकारे दावा व मनाई अर्ज करून बेकायदेशीरित्या व अनाधिकाराने आर्थिक व मानसिक खर्चास कारण निर्माण करत असुन सदर मनाई दावाही त्याचाच एक भाग असुन सदर वादीने सदर प्रतिवादींना निष्कारण खोटया व लबाडीच्या मनाई दावेमध्ये गुंतवुन आर्थिक व मानसिक खर्चास कारण केलेने सदर वादींकडून एक्झम्पलरी कॉस्ट म्हणून प्रतिवदींस रु. ५०,०००/- देणेबाबत आदेश होणे गरजेचे व आवश्यक आहे.

१५)**सबब, सदर प्रतिवादी यांची मे. कोर्टास नम्र विनंती की,**

अ. सदर वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज खर्चासह ना मंजुर करणेत यावा.

Assistant Superintendent
Gargoti

ब. सदर वादी यांनी प्रतिवादी यांना सदरचा मनाई अर्ज करून निष्कारण आर्थिक व मानसिक खर्चास भाग पाडलेने वादीकडून एक्सम्प्लरी कॉस्ट म्हणून प्रतिवादींस रू. ५०,०००/- देणेबाबत आदेश करणेत यावा.

क. जरुर तर म्हणणे दुरूस्ती करणेस परवानगी असावी.

----------------------

येणेप्रमाणे म्हणणे असे.

गारगोटी, मे.जा.व्हावे,

तारिख ०१/०७/२०२६ **प्रतिवादी ३** ----------------------

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. ३ श्री. दत्तात्रय गोपाळ पाटील, व.व. ७३, धंदा - शेती, रा. मुदाळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर परमेश्वरास स्मरुण सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वर नमुद, वरील म्हणण्यातील संपुर्ण मजकूर माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. आज मुक्काम गारगोटी,

तारीख - ०१/०७/२०२६

प्रतिवादी ३ ----------------------

**Assistant Superintendent**
**Gargoti**

## ॲफिडेव्हीट

मी प्रतिवादी नं. ३ श्री. दत्तात्रय गोपाळ पाटील, व.व. ७३, धंदा - शेती, रा. मुदाळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर परमेश्वरास स्मरुण सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील म्हणण्यातील संपुर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु. गारगोटी,

तारीख - ०१/०७/२०२६

Patil

**ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो**

**ॲड. व्ही.डी. म्हांगोरे**

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं. ३ श्री. दत्तात्रय गोपाळ पाटील, व.व. ७३, धंदा - शेती, रा. मुदाळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर शपथ घेऊन कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपुर्ण मजकूर माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी,

तारिख - ०१/०७/२०२६

Patil

Solemnly Affirmed before me by
Shri. Dattatraya Gopal Patil, Age 73 yrs.
of Mudal Tal. Bhudargad, who is
identified by Shri. V. D. Mhangore Adv
............whom I know personally
Dated :- 01.07.2026.

Assistant Superintendent

01 JUL 2026